## पाहिजेत

ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



## शैक्षणिक

शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश

इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/12 वी पास / नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार / कर्मचारी यांनाही प्रवेश ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय

पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा
मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २७७ वा | मंगळवार, दि. १६ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# एल निनोचा राक्षस पावसाला गिळंकृत करणार?

## IMD च्या नव्या अंदाजाने देशाची चिंता वाढली

## जागतिक हवामान बदलाचे परिणाम तीव्र होणार



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** यावर्षी प्रचंड उकाडा जाणवण्याची आणि पर्जन्यमान कमी असण्याची शक्यता जगभरातून वर्तवण्यात येत होती. तसेच जागतिक हवामान बदलाचे परिणाम आणखी तीव्र होण्याची भीती वर्तवण्यात येत होती. आता ती भीती खरी ठरत असल्याचे दिसत आहे.

मॉन्सून महाराष्ट्रात कोकणात आला. मात्र, त्याचवेळी एल निनोचा प्रभाव वाढल्याने मॉन्सूनची पुढील वाटचाल रखडली आहे. याचा देशासह जगभरातील वातावरणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

जगभरातील हवामान, वातावरण आणि समुद्राच्या तापमानावर परिणाम करणारा 'प्रबळ ते अति-प्रबळ' एल निनो निर्माण होण्याची शक्यता सुमारे ६६ टक्के इतकी आहे. त्यामुळे संशोधकांची चिंता वाढली आहे. एल निनो ही हवामान प्रणालीतील सर्वात महत्त्वाची घटना आहे आणि ती 'एल निनो-सदर्न ऑसिलेशन' (ENSO) या चक्राचा एक भाग आहे. 'ला निना' आणि 'एल निनो' हे या हवामान प्रणालीतील चक्राचे दोन परस्परविरोधी पैलू आहेत.

एल निनोच्या काळात, इक्वेडोरच्या किनारपट्टीपासून पश्चिमेकडे सुमारे १०,००० किलोमीटरपर्यंत पसरलेला समुद्राचा पट्टा अनेक महिने उबदार राहतो. यात सामान्यतः १ ते २ अंश सेल्सिअसची वाढ होते. तापमानातील ही काही अंशांची वाढ किरकोळ वाटते. मात्र, ती जगभरात विनाशकारी परिणाम घडवू शकते.

उन्हाळा आणि शरद ऋतूमध्ये एल निनो अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याने, समुद्राच्या पाण्यात आणखी उष्णता वाढेल. त्यामुळे आता तयारी सुरू करण्याची वेळ आली आहे, अशा इशारा संशोधकांनी दिला आहे. कोणत्याही दोन एल निनो घटना अगदी सारख्या नसतात, तरीही आपण अशा अनेक घटना पाहिल्या आहेत. त्यामुळे हवामान तज्ज्ञांना पुढे काय घडू शकते याची अंदाज घेत पुढील काळात योग्य त्या उपाययोजना करण्याचा सल्ला दिला आहे.

एल निनोच्या प्रभावामुळे समुद्रातील उबदार पाण्याचा परिणाम हवेच्या प्रवाहावर होतो. त्यामुळे काही भागात नेहमीपेक्षा जास्त पाऊस पडतो किंवा काही भाग कोरडे राहतात. यामुळे अमेरिकेच्या दक्षिणेकडील भागांसारख्या काही ठिकाणी वादळांची तीव्रता वाढू शकते, तर अटलांटिकमधील चक्रीवादळांची (हुरिकेन) तीव्रता कमी होऊ शकते.

एल निनोमुळे जगातील मत्स्यव्यवसायाला आधार देणाऱ्या अनेक सागरी परिसंस्थांचे जसे की प्रवाळ खडक (कोरल रीफ्स) आणि समुद्री गवताची क्षेत्रे (सी-ग्रास मेडोज) मोठे नुकसान होऊ शकते. एल निनोमुळे समुद्राच्या तापमानात तीव्र आणि व्यापक वाढ होण्याचे प्रकार घडतात, ज्यांना 'मरीन हीट वेव्हज' (सागरी उष्णतेच्या लाटा) असे म्हटले जाते.

जागतिक स्तरावर समुद्राचे तापमान आधीच उच्चांकाजवळ पोहोचले आहे. त्यामुळे एल निनोमुळे निर्माण होणाऱ्या सागरी उष्णतेच्या लाटा अनेक संवेदनशील मत्स्यक्षेत्रांना अत्यंत कठीण परिस्थितीत किंवा विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवू शकतात.

सागरी उष्णतेच्या लाटांमुळे स्थानिक उपसागर आणि खाड्यांमधील पाणी काही दिवस किंवा आठवडे सामान्य तापमानापेक्षा अधिक गरम होऊ शकते. मोठ्या स्वरूपात, २०१३-२०१४ मधील 'नॉर्थईस्ट पॅसिफिक वॉर्म ब्लॉब' (Northeast Pacific Warm Blob) सारख्या लाटा प्रचंड विस्तार धारण करू शकतात. यात टेक्सास राज्याच्या आकाराच्या तिप्पट क्षेत्रातील समुद्राचे तापमान अनेक महिने किंवा काही वर्षे सरासरीपेक्षा २ ते ३ अंश सेल्सिअसने जास्त राहू शकते.

याचा परिणाम म्हणजे विशिष्ट पाण्याच्या तापमानाशी जुळवून घेतलेल्या अनेक सागरी जीवांसाठी, सागरी उष्णतेच्या लाटांमुळे समुद्रात जगणे कष्टाचे ठरू शकते. काही मासे उबदार पाण्यात आपली चयापचय क्रिया इतकी वाढवतात की ते अन्नातून मिळणाऱ्या ऊर्जेपेक्षा वेगाने ऊर्जा खर्च करतात आणि त्यामुळे त्यांचा मृत्यू होऊ शकतो. सागरी उष्णतेच्या लाटेमुळे अलास्काच्या आखातात 'पॅसिफिक कॉड' माशांच्या संख्येत ७० टक्क्यांनी घट झाली होती. इतर परिणामांमध्ये प्रवाळांचा पांढरेपणा, मोठ्या प्रमाणावर हानिकारक शेवाळाची वाढ, समुद्री वनस्पतींचा नाश आणि सागरी सस्तन प्राणी किनाऱ्यावर अडकून पडण्याच्या घटनांमध्ये वाढ यांचा समावेश होतो.

हवामान प्रणालीमध्ये 'एल निनो'चे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. जेव्हा तो सक्रिय होतो, तेव्हा संपूर्ण जगाचे लक्ष त्याकडे जाते. एल निनोच्या काळात सागरी उष्णतेच्या लाटांची तीव्रता वाढण्याची शक्यता असते. एल निनोच्या काळात अमेरिकेच्या पश्चिम किनारपट्टीवर, उत्तरेकडून वाहणारे वारे सामान्यतः मंदावतात. यामुळे बाष्पीभवन कमी होते आणि समुद्राच्या तळाशी असलेले थंड पाणी वर येण्याची प्रक्रिया मंदावते. परिणामी, किनारपट्टीवर सागरी उष्णतेच्या लाटा निर्माण होण्याची शक्यता वाढते. कॅलिफोर्नियाचे पाणी आधीच अत्यंत उष्ण आहे. एल निनोमुळे परिस्थिती आणखी उष्ण होऊ शकते आणि ती अधिक काळ टिकू शकते.

भारताच्या पूर्वेला बंगालच्या उपसागरात, एल निनो आणि वॉकर सक्युर्लेशन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उष्णकटिबंधीय वायुप्रवाहाच्या पद्धतीमधील परस्परक्रियेमुळे सागरी उष्णतेच्या लाटांचा धोका वाढतो. १९९७-९८ मध्ये अमेरिकेच्या पश्चिम किनारपट्टीवर तळाशी निर्माण झालेली सागरी उष्णतेची लाट, समुद्राच्या पृष्ठभागावरील तापमान सामान्य पातळीवर आल्यानंतरही आणखी चार ते पाच महिने तशीच टिकून राहिली होती. जेव्हा सागरी उष्णतेची लाट समुद्रतळापर्यंत पोहोचली, तेव्हा २०१८ मध्ये बेरिंग समुद्रातील 'स्नो क्रॅब'च्या पकडीत ८४ टक्क्यांनी घट झाली होती.

ताज्या अंदाजानुसार, 'एल निनो'चा प्रभाव वाढत असताना अनेक सागरी उष्णतेच्या लाटा निर्माण होतील आणि २०२६ च्या अखेरीस जागतिक महासागराच्या जवळपास निम्म्या भागापर्यंत हानिकारक उष्णता पोहोचेल. विशेषतः कॅलिफोर्निया आणि मेक्सिकोच्या किनारपट्टीवर तीव्र सागरी उष्णतेच्या लाटा येण्याची दाट शक्यता आहे; तसेच हिंदी महासागर आणि दक्षिण महासागराच्या काही भागांतही हानिकारक उष्णतेचा प्रभाव जाणवू शकतो.

हिंदुस्थानवरही याचा मोठा परिणाम होऊ शकतो. हिंदुस्थानची अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे. त्यामुळे एल निनोचा नैऋत्य मॉन्सूनवर विपरीत परिणाम होतो. काही भागात अतिवृष्टी तर काही भागात दुष्काळ पडण्याची शक्यता असते. एल निनोचे तीव्र परिणाम दिसण्यास सुरुवात झाली आहे. जून महिना अर्धा उलून गेला तरीही अद्याप देशभरात सर्वत्र मॉन्सून पोहचलेला नाही. त्यामुळे जगासह हिंदुस्थानची चिंता वाढली आहे.

### एल निनोचा प्रभाव मान्सूननंतरही कायम

एल निनो या जून महिन्याच्या सुरुवातील प्रशांत महासागरात सक्रिय झाला आहे. नव्या अंदाजानुसार आता एल निनोचा प्रभाव सप्टेंबर महिन्यानंतर जास्त वाढण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे यावेळी एल निनोचा प्रभाव मान्सूननंतरही कायम राहण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाचे प्रमुख डॉ. मृत्यूंजय महापात्र यांनी याविषयी माहिती दिली आहे. सोबतच नागरिकांनी घाबरून जाऊ नये. एल निनोच्या प्रभावाचा सामना करण्यासाठी शासकीय पातळीवर तयारी सुरू झाली आहे, असेही त्यांनी सांगितले.

### जेव्हा-जेव्हा गरज असेल तेव्हा-तेव्हा हवामान...

डॉ. महापात्र यांच्या मतानुसार जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरच्या सुरुवातीच्या काही दिवसात एल निनोचा प्रभाव मध्यम स्वरुपाचा राहील. त्यानंतर एल निनोचा प्रभाव वाढत जाईल. हवामान विभागाचे याकडे पूर्ण लक्ष आहे. सोबतच जेव्हा-जेव्हा गरज असेल तेव्हा-तेव्हा हवामान विभागाकडून शेतकरी तसेच सामान्यांना माहिती देत राहू, अशीही माहिती त्यांनी दिली आहे.

### ज्या भागात पाऊस कमी होणार आहे, तिथे...

दरम्यान, डॉ. महापात्र यांनी दिलेल्या माहितीनुसार एल निनोचा संभाव्य धोका लक्षात घेऊन आयएमडीने याआधीच राज्यांना तसेच केंद्र सरकारला काय काळजी घ्यायला हवी, हे अगोदरच सांगितलेले आहे. ज्या भागात पाऊस कमी होणार आहे, तिथे योग्य ती खबरदारी घेतली जात आहे. बियाणांची अपलब्धता, जलव्यवस्थापन, पयार्यी पिके यावर सरकारकडून विशेष लक्ष दिले जात आहे.

---

## १५ जून 'शाळा प्रवेशोत्सव २०२६' उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक व गणवेशांचे वितरण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'शाळा प्रवेशोत्सव २०२६' कार्यक्रम आज शहरातील विविध मनपा शाळांमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.सचिन ओम्बासे यांनी मनपा मराठी मुले शाळा क्र. २८ येथे भेट देऊन विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले. तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षणात प्रगती करून उज्वल भविष्य घडवावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी सोबत प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी मल्हारी माने उपस्थित होते.तसेच तुळजापूर वेस्ट येथील महानगरपालिका मुलांची शाळा क्रमांक २ येथे आज स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांनी उपस्थिती लावली. सोलापूर महानगरपालिका मराठी मुलांची शाळा क्रमांक ४ येथे आज सभागृह नेते नरेंद्र काळे यांच्या बरोबरच अश्विनी चव्हाण नगरसेविका वनिता पाटील नगरसेविका उपस्थिती होते यावेळी सभागृह नेते नरेंद्रजी काळे यांच्या हस्ते परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. शहरतील विविध मनपा शाळांना नगरसेवक, नगरसेविका यांनी भेट देऊन प्रवेशोत्सव कार्यक्रमात सहभाग नोंदविला अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त श्रीमती पवीणा पवार, मुख्य लेखाधिकारी रत्नराज जवळगेकर उपायुक्त आशिष लोकरे उपायुक्त श्रीमती सोनाली यादव,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले,सहाय्यक आयुक्त गिरीष पंडित आणि सहाय्यक आयुक्त श्रीमती मनीषा मगर महानगरपालिका अधिकारी. या अधिकारी व पदाधिकाऱ्यांना संपर्क अधिकारी म्हणून मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक मनीष बांगर सुरेश कासार, संतोष बुलबुले, श्रीमती रजनी राऊळ, निलोपर शेख तसेच अनेक केंद्रीय मुख्याध्यापक यांनी प्रवेशोत्सव कार्यक्रमात महत्त्वाची भूमिका पार पाडली. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. शाळा प्रवेशोत्सव उपक्रमात विद्यार्थ्यांची स्वागत वेगवेगळे शाळेत वेगवेगळ्या पद्धतीने करण्यात आले कुठे विद्यार्थ्यांची बैलगाडीतून मिरवणूक काढली तर कुठे नवागत विद्यार्थ्यांसाठी खास बग्गी तयार करण्यात आली होती. मनपा शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा, प्रशिक्षित शिक्षकवर्ग आणि विविध उपक्रमांची माहिती पालकांना देण्यात आली.आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांचे मनोगत"शिक्षण हा समाज परिवर्तनाचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. प्रत्येक बालक शाळेत दाखल होऊन नियमित शिक्षण घेणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. पालकांनी मनपा शाळांवर विश्वास ठेवून आपल्या पाल्यांना नियमित शिक्षणासाठी प्रोत्साहित करावे. प्रत्येक विद्यार्थी हा उद्याचा सक्षम नागरिक आहे आणि त्याच्या सर्वांगीण विकासासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे."

---

## विद्यार्थ्यांनी आई-वडील, शिक्षक आणि मित्र यांना आयुष्यभर लक्षात ठेवावे - जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यभरातील सर्व शाळा सुरू झालेल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील ही सर्व शासकीय व खाजगी शाळा आज मोठ्या उत्साहात व आनंदात सुरू झाल्यात. सोलापूर शहराजवळील मजरेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणी विद्यार्थ्यांना सांगितल्या.

त्यांनी विद्यार्थ्यांना तीन गोष्टी आयुष्यात लक्षात ठेवण्याचा सल्ला दिला ङ्म आई-वडील, शिक्षक आणि शाळेतील मित्र. तसेच मी जे काही आहे त्याचे श्रेय माज्या शिक्षकांना जाते, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेची ही प्राथमिक शाळा सोलापूर शहरालगत आहे. शहरामध्ये खाजगी शाळांची संख्या ही मोठ्या प्रमाणात आहे. तरीही या शाळेतील शिक्षक वृंद यांनी येथील पटसंख्या कमी न होऊ देता त्यात वाढच केलेली आहे. मागील वर्षी 150 पटसंख्या असलेली ही शाळा यावर्षी 194 पटसंख्येपर्यंत घेऊन जाण्यात शाळेतील शिक्षकांनी मौलिक भूमिका बजावलेली आहे, त्यामुळे त्यांचे खूप कौतुक असल्याचे जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी सांगून असेच काम पुढेही करून विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी सदैव प्रयत्न करत राहावे, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले.

या कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख, मुख्याध्यापक प्रकाश राचेटी, माजी मुख्याध्यापक शिवानंद भिमन्नवरु, केंद्र प्रमुख सिद्राम वाघमोडे, विस्तार अधिकारी बापूराव जमादार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भैरप्पा कुरे, नगरसेविका वैशाली भोपळे, तसेच शिक्षक अप्पासाहेब ऊंबरानी, अमसिद्ध तीर्थकर व इतर शिक्षक उपस्थित होते.

प्रारंभी मजरेवाडी येथील शाळेच्या प्रांगणात जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर फित कापून शाळेच्या पहिल्या दिवसाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी वेदश्री विष्णू माने हिने एटीएस परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन तिचा सत्कार केला. यावेळी मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थी तसेच शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

शिक्षक अप्पासाहेब ऊंबरानी यांनी प्रस्तावित केले. व आजचा शाळा प्रवेश उत्सव विद्यार्थ्यांसाठी शाळेसाठी खूप महत्त्वाचा असल्याचे सांगितले. शाळेसमोरील वाहतुकीच्या रस्त्यावर गतिरोधक बसविण्याचीही त्यांनी मागणी केली.

---

## २५ हजार कामगारांसह 'घरकुल दिंडी' मंत्रालयावर धडकणार - कॉ. आडम मास्तर



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** विडी कामगारांना महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेले प्रतिदिन ४०२ रुपये किमान वेतन तात्काळ लागू करावे, कामगारांवर दबाव टाकून संमतीपत्रे घेण्याचे प्रकार थांबवावेत तसेच कॉ. गोदुताई परुळेकर नगर व रे नगर येथील नागरिकांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न सोडवावेत, या मागण्यांसाठी २ ऑक्टोबर २०२६ रोजी सोलापूर ते मुंबई मंत्रालयावर २५ हजार कामगारांसह भव्य 'घरकुल दिंडी' काढण्यात येईल, अशी घोषणा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केली.

सिटू संलग्न लाल बावटा विडी कामगार युनियनच्या वतीने सोमवार (दि. १५) रोजी कॉ. नरसय्या आडम (मास्तर) व सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम.एच. शेख यांच्या नेतृत्वाखाली सहायक कामगार आयुक्त कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. त्यानंतर सहायक कामगार आयुक्त मंगेश झोले यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी बोलताना कॉ. आडम म्हणाले की, अनेक विडी कारखानदार कामगारांवर शासनाचे किमान वेतन नाकारण्यासाठी दबाव टाकत असून जबरदस्तीने संमतीपत्रे घेण्याचे प्रकार सुरू आहेत. ही कृती कामगारांच्या वैधानिक हक्कांवर गदा आणणारी असून ती तात्काळ थांबविणे आवश्यक आहे.

कॉ. एम.एच. शेख यांनी सांगितले की, विडी कामगारांना किमान वेतन मिळावे यासाठी लाल बावटा विडी कामगार युनियन गेली २९ वर्षे संघर्ष करत आहे. शासनाने २०१४ (पान 2 वर..)


## पाहिजेत

वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य यांच्या संयुक्त विद्यमाने एक अभिनव व अनोखी योजणा राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| २) | सह/उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ३) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ४) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ५) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ५० वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार सदर संस्थेकडे राखीव राहतील व ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. सदर संस्थेचा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

संपर्क :- वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, महिंद्रा शोरुमसमोर, होटगी रोड, सोलापूर-१४३००३.

मो.९६५७०६९०६९, ९४०३४६३०७९

## संपादकीय

# नियोजनाची घागर उताणी

जून नच्या मध्यापर्यंत मान्सूनची चाहूल न लागल्याने आणि आणखी काही दिवस तरी पावसाची शक्यता नसल्यामुळे राज्यापुढे दुष्काळी स्थितीचे आव्हान उभे आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे धरणे काठोकाठ भरल्यानंतर सहा-सात महिन्यांतच ही वेळ का यावी, हा प्रश्न पडणे साहजिकच. जलसाठ्यांच्या व्यवस्थापनातील अपयश, हे त्याचे सरळसरळ उत्तर. पुणे, मराठवाडा, विदर्भ आणि नाशिक या विभागांतील धरणे जवळजवळ रिकामी झाली आहेत. त्यामुळे नव्या युगातील या 'मंदिरां'च्या पोटातील प्राचीन मंदिरे आणि गावांचे अवशेष पृष्ठभागावर येत आहेत.

बहुधा कोरड्या न पडणाऱ्या कोयना धरणातही केवळ नऊ अब्ज घनफूट (टीएमसी) इतकाच साठा शिल्लक आहे. त्यामुळे वीजनिर्मिती जवळपास थंडावली असून, दमदार पाऊस झाला नाही, तर सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांच्या अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची भीती आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारी उपाययोजना सुरू होतीलच; पण त्यापूर्वी गेल्या वर्षभरात धरणांमधील पाण्याचा विनियोग कसा केला, आणि आताच ही वेळ का आली, याची झाडाझडती घेऊन जनतेसमोर सत्य मांडणे आवश्यक आहे.

नागपूर, छत्रपती संभाजीनगर, जालना-परभणी आणि खानदेशातील अनेक शहरांमध्ये आठवड्यातून एक-दोनदाच पाणी येते. खरे तर १५ जुलैपर्यंत पिण्यासाठी पुरेल, एवढा जलसाठा राखून ठेवण्याचे नियोजन जलसंपदा विभाग आजवर करत आला आहे. मग, दीड महिना आधीच ही परिस्थिती उद्भवली; म्हणजेच उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि वितरणात काही तरी चुकते आहे, हे नक्की. मुख्य अडचण जलसाठे राखणारा जलसंपदा विभाग आणि शहरात पाणीवितरण करणारी महापालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावात आहे. पुण्याच्या पाण्यात ४० टक्के गळती असल्याची कबुली पूर्वी महापालिका आयुक्तांनी दिली होती; ती दूर करण्यासाठी काय पावले उचलली, याचे उत्तर मिळालेले नाही.

पूर्वी कालव्यातून पाणीपुरवठा करताना पाण्याची गळती-वाफ होते, असे सांगितले जाई. आता महापालिका शंभर टक्के पाणी जलवाहिनीतून घेते, त्यामुळे तोही प्रश्न राहिला नाही. अशा वेळी ह्यग्रामीण विरुद्ध शहरीह्व असा वाद जाणीवपूर्वक पेटवून दिला जातो. खरे तर पाऊस कमी होणार, याचे अंदाज दोन महिन्यांपूर्वीच आले असतानाही उन्हाळ्यात कालव्यातून पाणी का सोडले गेले आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या आचारसंहिता काळात कोणाच्या सूचनांवरून पाणी सोडले, अशा प्रश्नांची उत्तरे नागरिक मागत आहेत. पुण्यात दोन-चार टीएमसी पाण्यावरून वाद आहेत; उजनीची कथा वेगळीच आहे.

राज्यातील सर्वांत मोठे, शंभर टीएमसी क्षमतेचे हे धरण पूर्ण भरते आणि वर्षात ते रिकामेही केले जाते; त्याची कुठेही हाक ना बोंब! त्याच धरणावर अवलंबून असलेल्या सोलापुरात मात्र अजूनही चार-पाच दिवसांनीच पाणी मिळते. दररोज पाणीपुरवठ्याच्या आश्वासनांना भुलून नागरिकांनी सत्तांतरही केले; पण दोन निवडणुकांनंतरही पाण्याच्या स्थितीत थेंबभराचाही फरक नाही.

जून महिन्याच्या सुरुवातीलाच अनेक गावे-शहरांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू झाल्याने टँकर माफियांचेही फावले आहे. टँकरमुक्त महाराष्ट्राच्या घोषणा गेली तीन दशके ऐकू येत आहेत; पण पाऊस कमी होवो की अधिक, अद्याप तरी त्यातून महाराष्ट्राची सुटका झालेली नाही. बेसॉल्ट खडकांनी बनलेल्या महाराष्ट्राच्या बहुसंख्य भागांत पाणी साठवणे आणि सिंचनावर मयार्दा आहेत. अशा स्थितीत उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन हाच मार्ग उरतो. 'जलयुक्त शिवार' सारख्या योजना पूरक म्हणून महत्त्वाच्या आहेत, मात्र दुष्काळ मुक्तीचा तो मुख्य उपाय नव्हे. पर्जन्य जलसंचय करून भूजलाच्या साठ्यात भर घालणे किंवा शहरांतील वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यासाठी कायदे-नियम सारे तयार आहेत. मात्र, त्याच्या अंमलबजावणीचाही भीषण दुष्काळ आहे. पाण्याच्या पुनर्वापराचे प्रमाण दहा टक्केही नाही. शहरांतील वाहिन्यांची दुरुस्ती, धरणांतील गाळ काढणे, गळती-पाणीचोरी रोखणे अशा अनेक उपाययोजना कागदावरच आहेत. योजनांचा अवाढव्य खर्च, तंत्रज्ञान अशा अनेक अडचणी त्यामागे आहेत; मात्र मुख्य अडसर आहे राजकीय इच्छाशक्तीचा. तो दूर होईल तो सुदिन!

# पावसाळी नक्षत्रांची वाहनं बदला!

पावसासाठी बेडकाचं लग्न लावण्याऐवजी लोकांनी झाडं लावली पाहिजेत! पण मीडिया पावसासाठी आतुर झालेल्यांच्या माथ्यावर अंधश्रद्धेचा धोंडा ठेवताना दिसतो!

विज्ञानाने अनेक शोध लावले तरी पाऊस कधी, कुठे आणि किती पडणार, याबाबत निश्चितता नाही. परिणामी, हवामान खात्याचा "अंदाज" हा बऱ्याचदा विनोदाचा विषय होतो. तथापि, हवामान खात्याची अनिश्चितता हा विज्ञानाचा दोष नाही. निसर्ग हा लहरी आहे. वातावरणात प्रत्येक क्षणाक्षणाला बदल होत असतो. या बदलांची नोंद घेत अंदाज व्यक्त करणं, हे हवामान खात्याचं काम आहे. ह्या नोंदीत थोडा जरी घोटाळा झाला, तरी हवामानाचा अंदाज चुकू शकतो. आपल्या देशात हवामान तज्ज्ञ वसंत गोवारीकर यांचा फॉर्म्युला हवामानाचा-विशेषतः पावसाचा अंदाज व्यक्त करण्यासाठी वापरला जातो; तो शेतीसाठी उपयुक्तही ठरतो. तथापि, "या अंदाजावर पूर्णपणे अवलंबून राहू नका," असं आवाहन करण्याची वेळ शेतकी खात्यावर वारंवार येत असते. सध्या "ज्येष्ठ" अधिक मास सुरू आहे. ह्याला गावाकडच्या भाषेत "धोंड्या"चा महिना म्हणतात. जावयाला सुवर्णदान करायच्या ह्या महिन्यात सासुरवाडीच्या माथी खचाऱ्या धोंडा आढळतो. त्याचप्रमाणे हा अधिक मास पावसाअभावी शेतकऱ्यांच्या माथी "दुबार पेरणी"चा धोंडा हाणणार का, अशी परिस्थिती निर्माण झालीय.

"भावाआधी बहिणीकडे पाळणा हाले" तसे यंदा "रोहिणी" नक्षत्र राज्यभर बरसले. पण "मृगशीर्ष" कोरडे जाईल, अशी सध्याची स्थिती आहे. "एल निनो" (El Nino) ने यावेळच्या उन्हाळ्यात अक्षरशः भाजून काढले. "एल निनो" हा (पॅसिफिक ओशन =) प्रशांत महासागरातील पाण्याच्या तापमानात होणारा एक नैसर्गिक बदल आहे. यामुळे जागतिक तापमान वाढते. अनेक ठिकाणी तीव्र दुष्काळ पडतो; तर काही भागांत अतिवृष्टी व महापूर येतात. विशेष म्हणजे, वाऱ्याची दिशा बदलते. प्रशांत महासागरावर नेहमी पूर्वेकडून पश्चिमेकडे वारे वाहतात. ते कमकुवत होतात. यामुळे गरम पाणी पूर्वेकडे (दक्षिण अमेरिका किनाऱ्याजवळ) जमा होते. परिणामी, भारतात मान्सूनचे बाष्पयुक्त वारे मंदावतात आणि पावसाचे प्रमाण कमी होऊन अनेक भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ शकते. अमेरिकाच्या "क्लायमेट प्रेडिक्शन सेंटर" (CPC) च्या अंदाजानुसार, यंदाचा "अल निनो"चा प्रभाव आतापर्यंतच्या नोंदणीत सर्वाधिक तीव्र होता. यामुळे २०२७ चे वर्षदेखील विक्रमी उष्णतेचे असू शकते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. हा अथवा हवामानाचा अंदाज सांगणारं विज्ञान चुकीचं अथवा खोटं ठरत नाही. अंदाज चुकण्याचं कारणही विज्ञानच स्पष्ट करतं. यावरून विज्ञानाची उपयुक्तता आणि अपरिहार्यता समजून घ्यावी. यासाठी कृषिखात्याची भूमिका आग्रही हवी. ते त्यांचं कर्तव्य आहे. तथापि, याबाबतीत सरकारी भमिका आजवर बोटचेपीच राहिली आहे. पूर्वी "आत्याबाईच्या पाठीला घामोळं फुटलं" की, पाऊस पडतो, असे आडाखे मांडले जात. तसे 'बेडूक-बेडकीचं लग्न' लावून, नववधूला कडुनिंबाच्या पानांनी सजवून "धोंडी धोंडी.... पाणी दे"चा गजर केल्यानंतर पाऊस पडतो, असा समज आजही आहे. "पर्जन्य पडे अपुल्या स्वभावे। वेदावीर्य शक्ती नाही," असे संत तुकोबांनी ठणकावून सांगितले तरी शेंड्या ताठ करून यज्ञ- यागाचा झोल- झमेला करणारे वेदमूर्ती आहेत. अशा प्रकारांना मीडियातून प्रसिद्धी दिली जाते.

यावेळी "मृग" तथा "मृगशीर्ष" (आकाशात हरिणाच्या शिंगासारखी ग्रह रचना असणारं) ७ ऐवजी ८ जूनला लागलं. पण आठवडा उलटायला आला तरी हव्या तशा सरीवर सरी आल्या नाहीत. त्या "धोंडी"ला आळवून, गावदेवाला बोकड बळी देऊन, शंकराच्या पिंडीला बुडवून अथवा पुराणातला "वरुणपुत्र मारुतीराया"ला साकडं घालून येणार नाहीत. तसंच, पाऊस कुठल्या वाहनावर बसूनही येत नाही. तथापि, धंद्यासाठी कॅलेंडरमध्ये पंचाग घुसवणाऱ्यांनी वर्षभरातल्या २७ नक्षत्रांसाठी पशू-पक्ष्यांचं वाहन दिलंय. "नक्षत्र" हे "पंचाग"च्या पाच अंगांपैकी महत्त्वाचं अंग आहे. यासाठी आकाशाचे चार विभाग कल्पून नक्षत्रपट तयार केलाय. या नक्षत्रपटात दिसणारे लहान-मोठे तारे म्हणजे नक्षत्र! चंद्राला हे विभागात्मक एक नक्षत्र ओलांडण्यासाठी एक दिवस लागतो. त्यामुळे दररोज एक वेगवेगळं नक्षत्र असतं. (चंद्र ज्या नक्षत्रात असताना व्यक्तीचा जन्म झालेला असतो, ते ज्योतिषशास्त्रानुसार त्याचं जन्म नक्षत्र ठरतं.) सूर्याला मात्र एक विभागात्मक नक्षत्र ओलांडण्यास तेरा अथवा चौदा दिवस लागतात. पंचांगानुसार, हा "नक्षत्र" प्रवास पशू-पक्ष्यांच्या वाहनावरून होतो. एकूण २७ पैकी पुढील ९ नक्षत्रं पावसाची मानली जातात.

१) मृग (वाहन = बेडूक) : या नक्षत्रात चांगला आणि मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज असतो.

२) आर्द्रा (वाहन = गाढव) : या काळात पाऊस कमी पडण्याची शक्यता असते.

३) पुनर्वसू (वाहन = घोडा) : ह्याचा अर्थ, सर्वत्र चांगला पाऊस पडणे, असा होतो.

४) पुष्य (वाहन = उंदीर) : ह्या काळात मुसळधार पावसाचा अंदाज असतो.

५) आश्लेषा (वाहन = हत्ती): उत्तम आणि समाधानकारक पावसाचा संकेत देणारे नक्षत्र.

६) मघा (वाहन = मोर) : या काळात पाऊस खंडीत होऊन काही ठिकाणी जोरदार सरी बरसतात.

७) पूर्वा (वाहन : गाढव) : या नक्षत्रात बऱ्यापैकी पाऊस होतो.

८) उत्तरा (वाहन = बेडूक) : पाऊस चांगला आणि तापमानवाढीची शक्यता असते.

९) हस्त (वाहन = उंदीर ): पावसाची उघडझाप आणि काही ठिकाणी मोठ्या सरी पडतात.

हत्ती, बेडूक, म्हैस, मोर ह्यांना पाणी किंवा पाऊस आवडतो. त्या वाहनांच्या नक्षत्र काळात चांगला पाऊस पडतो. तर गाढव, उंदीर, कोल्हा ह्या प्राण्यांना पाणी आवडत नाही. त्या वाहनांच्या नक्षत्र काळात पाऊस कमी पडतो किंवा हुलकावणी देणारा होतो. "मृग" ते "हस्त" दरम्यानच्या ९ नक्षत्रात पावसाळा असल्याने ही नक्षत्रं महत्त्वाची ठरतात. या काळात पाऊस झाला नाही किंवा अति झाला, तरी कोणतं नक्षत्र सुरू आहे; त्याचं वाहन कोणतं, ह्याची तपासणी केली जाते. ती शेती व्यवसायाशी संबंधित लोकांसाठी महत्त्वाची माहिती असते. हे लक्षात घेऊन 'सहदेव भाडळी' म्हणजे "रोग अनेक, इलाज एक" सारख्या पोथ्यांची निर्मिती झाली. त्याचा पगडा भारतात बहुसंख्याक असलेल्या ग्रामीण व शेतीशी संबंधित जनतेवर आजही आहे. 'सहदेव-भाडळी' ही ७०० वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या ज्योतिषी भावंडांची नावं आहेत अथवा एकच जोडनाव असल्याचा समज आहे. त्यांच्या नावाच्या पोथीत, खरं तर तिथी, वार, महिना, नक्षत्रं यावरून भविष्य नाही, तर वस्तुस्थिती सांगितली आहे. परंतु त्याचं ज्योतिष्यांनी लोकांना भटीपाशात फसवण्यासाठी भविष्यकथनात रूपांतर केलंय. पावसाळ्यातील नक्षत्रांसंबंधाने 'सहदेव भाडळी'त लिहिलंय –

मृग करी झाडाझाड,
आर्द्रा न पडे कोय।
भाडळी म्हणे सहदेवजी,
पृथ्वी प्रलय होय॥

अर्थात, मृग नक्षत्रात नुसताच
वारा सुटला, आर्द्रा नक्षत्रात
अजिबात पाऊस पडला नाही,
तर मोठा दुष्काळ पडेल. तसंच –
पुनर्वसु न पडे काही,
पुष्प जाय कोरडा।
भाडळी म्हणे सहदेवजी,
वाळूच्या कण्या भरडा॥

म्हणजे, जर पुनर्वसु व पुष्प नक्षत्रात पाऊस पडला नाही, तर धान्याऐवजी माती दळावी लागेल. तसेच –

उत्तरा पडे चार दिन, हस्त न पडे कोय।
भाडळी म्हणे सहदेवजी, पृथ्वी प्रलय होय॥

अर्थात, उत्तरा नक्षत्रात चार दिवस पाऊस पडून हस्त नक्षत्रात मुळीच पाऊस पडला नाही, तर दुष्काळ पडेल.

ही 'सहदेव-भाडळी' मराठीत आहे. मराठी महाराष्ट्राचा विस्तार खूप मोठा आहे. त्यामुळे पावसाळी नक्षत्र एकीकडे खूप बरसतं, तर दुसरीकडे कोरडं जातं. परिणामी, 'सहदेव भाडळी'चं म्हणणं सर्वत्र खरंच ठरतं. तथापि, खऱ्याच्या भासातलं खोटं उघडं पडतं. स्वाती नक्षत्राबद्दल 'सहदेव-भाडळी'त लिहिलंय–

**पडल्या साई स्वाती,**
**तर पिकतील माणिक मोती।**
**न पडे स्वाती,**
**तर राजहंस माती खाती॥**

ह्याचा अर्थ, स्वाती नक्षत्राचा पाऊस समुद्रात पडतो, त्यामुळे मोती पिकतात. मोती हे राजहंसाचं अन्न असल्यामुळे स्वाती नक्षत्र कोरडं गेल्यास राजहंसाची उपासमार होईल. तथापि, ही सारीच कविकल्पना आहे. "ते स्वास्तीस्तव अब्धिशुक्ति पुटकी मोती घडे नेटके" या वामन पंडिताच्या कविकल्पनेला खरं मानल्यामुळे 'सहदेव- भाडळी'ची फसगत झाली असावी. तथापि, पाऊस पडो, न पडो 'सहदेव भाडळी' सारख्या पोथ्या भविष्यवाद्यांना फसवण्यासाठी उपयुक्त ठरतात. यावेळी मृग जवळपास कोरडं गेलं. यावेळी ह्या नक्षत्रांचं वाहन बेडूक होतं. पण पावसाअभावी बेडकांनी आपली समाधी अवस्था सोडली नाही. २२ जूनपासून "आर्द्रा" नक्षत्र सुरू होतंय. त्याचे वाहन "गाढव" आहे. उंदीर व कोल्ह्याप्रमाणे गाढवाला पाऊस-पाणी पसंत नाही. त्यातून हवामान खात्याप्रमाणे पंचांगालाही खोटं ठरवण्याचं पावसानं ठरवलं तर, तो गाढवासारखा कोसळेल! असे हे दुहेरी संकट आहे.

त्यानंतरचे "पुनर्वसु" नक्षत्र घोड्यावर येईल. त्यावेळी दिमाखात टापा टाकीत येईल की धापा टाकीत येईल? पुनर्वसुच्या पुढचे "पुष्य" नक्षत्र उंदीर वाहनावरून येणार आहे. पुढचे "आश्लेषा" हत्तीवरून डुलत- डुलत येणार! त्यापुढचे मोरावरून येणारे "मघा" नक्षत्र मोरावरून नाचत- नाचत येणार की पब्लिकला ओला- सुका दुष्काळ करीत नाचवणार ? आणखी एक प्रश्न. नीटपणे बरसली तर दुष्काळ टाळणाऱ्या या नक्षत्रांची वाहनं पशू-पक्ष्यांची का? पाऊस पाडणाऱ्या नक्षत्रांची वाहनंही काळानुरूप वेगवान हवीत. त्यासाठी बुद्धी वर्तमानाला समजून घेणारी; भिडणारी हवी. पुरेसा पाऊस पाहिजे, तर भरपूर झाड हवीत! बेडूक-बेडकीचं लग्न लावून 'धोंडी'च्या नावानं टाहो फोडण्याऐवजी झाडं लावली पाहिजेत. ते सांगण्याची जबाबदारी सरकारची आहे, तशीच प्रसारमाध्यमांचीही आहे. पण प्रसारमाध्यमं पावसासाठी आतुर झालेल्यांच्या माथ्यावर अंधश्रद्धेचा धोंडा ठेवण्याचा उद्योग करताना दिसतात. त्यांचा हा उद्योग यंदा "पुष्य" नक्षत्राचं वाहन असलेल्या हत्तीच्या पायाखाली नष्ट होवो! त्याने समाजाचं नेतृत्व करणाऱ्यांच्या बिनडोकपणाचा दुष्काळ तरी संपेल!

### नक्षत्र- महिन्यांचे 'संशयकल्लोळ'

प्राचीन हिंदू ऋषींनी राशीचक्राची २७ नक्षत्रांमध्ये, म्हणजेच चंद्राच्या तारकासमूहांमध्ये, विभागणी केली आहे. प्रत्येक तारकासमूह १३ अंश आणि २० मिनिटांचा असतो. मेष राशीच्या ० अंशांवर असलेल्या "अश्विनी" नक्षत्रापासून नक्षत्रांची गणना सुरू होते. मीन राशीचे ३० अंश "रेवती" नक्षत्राने व्यापलेले आहेत. ह्या नक्षत्रांची नावे अशी आहेत –

१) अश्विनी २) भरणी ३) कृत्तिका ४) रोहिणी ५) मृगशीर्ष ६) आर्द्रा ७) पुनर्वसू ८) पुष्य ९) आश्लेषा १०) मघा ११) पूर्वा फाल्गुनी १२) उत्तरा फाल्गुनी १३) हस्त १४) चित्रा १५) स्वाती १६) विशाखा १७) अनुराधा १८) ज्येष्ठा १९) मूळ २०) पूवार्षाढा २१) उत्तराषाढा २२) श्रवण २३) धनिष्ठा २४) शततारका २५) पूर्वा भाद्रपदा २६) उत्तरा भाद्रपदा २७) रेवती.

ह्यातील बऱ्याच नावांनी मुलींचे नामकरण झालेले दिसते. पण त्यापुढची गंमत गोविंद बल्लाळ देवल यांच्या "संगीत संशयकल्लोळ" ( पहिला प्रयोग : ऑक्टोबर १९१६) ह्या नाटकात आहे. त्यातील पुरुष पात्रांची नावे अश्विनशेठ, फाल्गुनराव, वैशाखशेठ, कार्तिकशेठ, भादव्या (भाद्रपद), आषाढ्या अशी मराठी महिन्यांची आहेत. तर, स्त्री पात्रांची नावे रेवती, कृत्तिका, स्वाती, मघा, रोहिणी अशी नक्षत्रांची आहेत.

**– ज्ञानेश महाराव**
ज्येष्ठ पत्रकार- संपादक

पान १ वरून

## २५ हजार कामगारांसह 'घरकुल...

मध्ये किमान वेतन अधिसूचित केले असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी अद्याप झालेली नाही.

निवेदनातील प्रमुख मागण्या म्हणजे सर्व विडी उद्योगांची तात्काळ तपासणी करून कामगारांवरील दबाव थांबविणे, जबरदस्तीने घेतलेली संमतीपत्रे कायदेशीरदृष्ट्या अमान्य घोषित करणे, प्रतिदिन ४०२ रुपये किमान वेतनाची प्रभावी अंमलबजावणी करणे, दोषी कारखानदारांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई करणे, दबाव किंवा भेदभाव करणाऱ्यांविरुद्ध कठोर निर्देश जारी करणे तसेच विशेष चौकशी मोहीम राबवून अहवाल सार्वजनिक करणे या होत्या.

या आंदोलनात सिटूचे राज्य उपाध्यक्ष युसुफ शेख (मेजर), नसीमा शेख, ॲड. अनिल वासम, दत्ता चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने विडी कामगार सहभागी झाले होते. आंदोलनाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा कोषाध्यक्ष दीपक निकंबे, विल्यम ससाणे, बापू साबळे, विक्रम कलबुर्गी, वसीम मुल्ला,रफिक काझी, आप्पाशा चांगले, बालाजी तुम्मा, वसीम देशमुख, हसन शेख, वीरेंद्र पद्मा, नरेश दुगाने, नरसिंग बुगले, मल्लेशम कारमपुरी, नरेश गुल्लापल्ली, चंटी बिटला, योगेश आकिम, दिनेश बडगु, बालाजी गुंडे, शिवा श्रीराम, बालकृष्ण मल्याळ, विजय हरसुरे, राधागोपाल बंडी, प्रकाश कुऱ्हाडकर, श्रीनिवास तंगडगी आणि प्रशांत विटे, आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## इंग्रजांविरुद्ध आमचा बाप लढला; आमच्या नशिबी मात्र गुन्हेगारीचा कलंक : डॉ. अरुण जाधव

**बार्शी (कटूसत्य वृत्त)** : देशाच्या स्वातंत्र्यासाठी रक्त सांडणाऱ्या आणि इंग्रजांविरुद्ध संघर्ष करणाऱ्या भटके-विमुक्त समाजाच्या माथी इंग्रजांनी गुन्हेगारीचा शिक्का मारला. स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे उलटून गेली तरी हा कलंक पूर्णपणे पुसला गेला नसल्याची खंत भटके-विमुक्त समाजाचे नेते डॉ. अरुण जाधव यांनी व्यक्त केली.

भटके-विमुक्त समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच समाजाच्या हक्कांसाठी सुरू करण्यात आलेली 'मुशाफिरी यात्रा' गुरुवार, दि. ११ जून रोजी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यात दाखल झाली. बार्शी येथे आयोजित कार्यक्रमात डॉ. जाधव बोलत होते.

संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्क व अधिकारांबाबत जनजागृती करणे, तसेच भटके-विमुक्त समाजाची अचूक लोकसंख्या शासनाच्या नोंदीत यावी यासाठी घरगणना व स्वतंत्र जनगणना करण्याची मागणी या यात्रेतून करण्यात येत आहे. यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यात बार्शी शहरातील कैकाडी, मदारी, पारधी, भिल्ल, वडार, नाथपंथी गोसावी, जोशी, वासुदेव, वैदू आदी समाजांच्या पालांवर व तांड्यांवर जाऊन जनजागृती करण्यात आली.

समाजातील शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच भटके-विमुक्त समाजाची अचूक नोंद व्हावी यासाठी जनगणना आणि घरगणना ही काळाची गरज असल्याचा संदेश या यात्रेद्वारे देण्यात आला.

कार्यक्रमात मुशाफिरी यात्रेचे समन्वयक प्रा. संतोष चव्हाण, नागनाथ अडसूळ, मनीष देशपांडे आणि स्वाती ठोंगे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ऋषी गायकवाड, जाकीर तांबोळी, राजेंद्र कुलकर्णी, आनंद चव्हाण, रूक्षराज वैद्य, पठाण हैदर, राहुल चव्हाण यांच्यासह भटके-विमुक्त समाजातील अनेक बांधव उपस्थित होते.

## 'कृषीमित्र' नावाने सुरू असलेल्या बनावट भरती जाहिरातींपासून सावध राहावे

### जिल्हा अधिक्षक यांचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** कृषी मित्र नावाच्या पदासाठी फसव्या जाहिरात व्दारे तरुणांची दिशाभूल केली जात असल्याचे कृषी विभागाच्या निदर्शनास आले असून . काही वृत्तपत्रे, सोशल मीडिया तसेच विविध माध्यमांतून "कृषीमित्र" नावाच्या पदासाठी मोठ्या प्रमाणावर भरती होत असल्याच्या जाहिराती प्रसिद्ध केल्या जात आहेत. या जाहिरातींमध्ये आकर्षक वेतन व मोठ्या संख्येने पदे उपलब्ध असल्याचा दावा करण्यात येत आहे.

याबाबत कृषी आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे की, कृषी विभागामध्ये "कृषीमित्र" या नावाचे कोणतेही अधिकृत पद अस्तित्वात नाही. तसेच कृषी विद्यापीठांमध्येही अशा पदनामाची कोणतीही शासनमान्य भरती प्रक्रिया सुरु नाही. त्यामुळे संबंधित जाहिराती या दिशाभूल करणाऱ्या असून बेरोजगार युवकांची आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न असल्याची शक्यता आहे.

शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून संबंधित जाहिरातींची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. आवश्यकतेनुसार संबंधित संस्था, व्यक्ती अथवा जाहिरातदारांविरुद्ध स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

कृषी विभाग सर्व शेतकरी, विद्यार्थी, बेरोजगार युवक-युवती तसेच नागरिकांना आवाहन करीत आहे की, अशा कोणत्याही जाहिरातींवर विश्वास ठेवण्यापूर्वी संबंधित माहितीची खातरजमा करावी. शासनाच्या अधिकृत भरतीविषयक जाहिराती केवळ शासनाच्या अधिकृत संकेतस्थळांवर व अधिकृत माध्यमांतूनच प्रसिद्ध केल्या जातात.

कोणत्याही संशयास्पद जाहिराती अथवा भरती प्रक्रियेबाबत माहिती मिळाल्यास जवळच्या कृषी कार्यालयाशी किंवा संबंधित प्रशासनाशी त्वरित संपर्क साधावा. अश्या कोणत्याही जाहिरातीला बळी पडू नये असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

## कुमठे प्रशालेमध्ये प्रवेशोत्सव साजरा




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय कुमठे,सोलापूर येथे आज दिनांक 15 जून 2026 रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. प्रथमतः शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. ब्रह्मदेव दादा माने यांच्या प्रतिमेचे पूजन प्राध्यापक संजय जाधव यांच्या हस्ते करून सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप करण्यात आले तसेच नूतन पर्यवेक्षक विजयसिंह क्षीरसागर यांनी आपल्या पदाचा कार्यभार आज स्वीकारला. या कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड माजी पर्यवेक्षक वसंत गुंगे राष्ट्र विकास प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका मंजुश्री जमखंडीकर उपस्थित होते. प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर सहकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## हप्ता खात्यात जमा; वाळूच नाही, साडेसात हजार घरकुलांचे बांधकाम रखडले



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** ग्रामीण भागातील घरकूल लाभार्थ्यांच्या बँक खात्यात शासनाकडून घरकूल योजनेचे हप्ते जमा होत असले तरी बांधकामासाठी आवश्यक असलेल्या मोफत वाळूच्या पुरवठ्याचा प्रश्न अद्याप कायम असल्याचे चित्र आहे. शासनाने पाच ब्रास मोफत वाळू देण्याची तरतूद केली असली तरी प्रत्यक्षात वाळू उपलब्ध होत नसल्याने जिल्ह्यातील सुमारे साडेसात हजार घरकुलांचे बांधकाम रखडल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

शासनाकडून घरकूल मंजूर झाल्यानंतर अनेक लाभार्थ्यांनी आपल्या स्वप्नातील घराचे बांधकाम सुरू केले आहे. अनुदानाचे हप्तेही टप्प्याटप्प्याने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत आहेत. मात्र, बांधकामासाठी आवश्यक असलेली वाळू उपलब्ध होत नसल्याने कामाचा वेग मंदावला असून अनेक ठिकाणी बांधकामे अर्धवट अवस्थेत आहेत.

दक्षिण सोलापूर तालुक्यासह जिल्ह्यातील विविध भागांतून मोफत वाळू मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. काही लाभार्थ्यांना खासगी विक्रेत्यांकडून वाळू खरेदी करावी लागत असल्याने अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. त्यामुळे घरकुलांचे अंदाजपत्रक कोलमडत असल्याचेही सांगितले जात आहे.

शासनाची घरकूल योजना ही केवळ आर्थिक मदत देण्यापुरती मर्यादित नसून लाभार्थ्यांना प्रत्यक्ष घर उभारता यावे हा तिचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे हप्त्यांसोबतच बांधकामासाठी आवश्यक साहित्य वेळेत उपलब्ध होणेही तितकेच महत्त्वाचे मानले जात आहे. मात्र, सोलापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी वाळूचा पुरवठा होत नसल्याने लाभार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### वाळूच्या तक्रारींची माहिती घेणार : सीईओ

जिल्ह्यातील ७ हजार ७५६ घरकूल लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ३३ कोटी ४८ लाख रुपयांचा निधी जमा होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे अपूर्ण घरकूल बांधकामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, वाळू उपलब्ध नसल्याच्या तक्रारींबाबत तालुकास्तरावरून माहिती घेण्यात येणार असून त्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाईल, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.

## नेताजी प्रशालेत नवागतांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रवेशोत्सव व मोफत पाठ्यपुस्तक वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवागत विद्यार्थ्यांना दोन घोडे व दोन उंटावर बसवून ढोल-ताशांच्या गजरात आणि पुष्पवृष्टी करत प्रशालेत आणण्यात आले. या अनोख्या स्वागत सोहळ्यामुळे विद्यार्थी, पालक व उपस्थित नागरिकांमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले. त्यानंतर जयश्री बिराजदार व मीनाक्षी वांगीकर यांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत केले. औक्षणानंतर विद्यार्थ्यांना पुष्प, खाऊ तसेच शासनाकडून प्राप्त झालेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

यावेळी अण्णाराव कुंभार म्हणाले, विद्यार्थ्यांना जिद्द, चिकाटी आणि सातत्य यांचे महत्त्व पटवून देत शिक्षणाच्या माध्यमातून उज्ज्वल भविष्य घडविण्याचे आवाहन केले. समोरचा काळ आव्हानात्मक असला तरी शिक्षणाच्या प्रकाशातूनच यशाचा मार्ग खुला होतो असे ही ते म्हणाले. यावेळी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वषार्साठी शुभेच्छा देत अभ्यास, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले तर शिवानंद पुजारी यांनी आभार मानले.

### वात्रटिका

**कुस्ती, मस्ती, धास्ती**

जवळ ठेवावे तर मस्ती
थोडे दूर करावे तर कुस्ती...
चांगलेच दूर ठेवावे तर ते
खूष आणि आम्हाला धास्ती...
फोडाफोडीचे जाळे पसरले
फुटाफूटीचा रोग वाढला...
परिणाम शुन्य भासला,जरी
खडसावून आदेश काढला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा नवा उत्साह



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालयात सोमवार दिनांक 15 जून 2026 रोजी शाळेचा पहिला दिवस म्हणून संस्थेचे संस्थापक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी व शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक मराठी, कन्नड व सेमी इंग्रजी माध्यमाच्या सर्व मुलांना संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, संस्थेच्या शिक्षण विभाग प्रमुख सौ रूपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी यांनी औक्षण केले. त्यानंतर गुलाबपुष्प व चिक्की, चॉकलेट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तद्नंतर विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहात व आनंदात शाळेत प्रवेश केला. यावेळी शासनाकडून आलेले पाठ्यपुस्तक सर्व विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप आदी मराठी, कन्नड, सेमी विभागाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

शाळेचा पहिला दिवस म्हणून संपूर्ण शाळा सजवले होते. गेटवर सुंदर रांगोळी, दर्शनी भागात रंगीबेरंगी फुगे लावले होते. सेल्फी पॉईंट मधून विद्यार्थी फोटो काढत होते, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व आनंद दिसून आला.

# मोहोळ पोलीस ठाण्यात दाखल होत असलेल्या खोट्या गुन्ह्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक आणि पोलीस अधीक्षकांना भेटणार - बिलालभाई शेख



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील अवैध व्यवसायाबरोबर संघटित गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाने सातत्याने दक्ष राहणे गरजेचे आहे. विविध झालेल्या घटना आणि प्रकारांची खात्री करूनच गुन्हे दाखल होणे अत्यावश्यक बाब आहे. मात्र गेल्या काही महिन्यापासून कथीत घटना आणि फेक गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण वाढले आहे. यापुढील काळात मोहोळ पोलीस प्रशासनाने नीट खात्री न करता घाईत खोटे गुन्हे दाखल होऊ नये त्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी मोहोळ पोलिसांना आवश्यक त्या सूचना देणे गरजेचे आहे. खोटे गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण कमी न झाल्यास कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजन शर्मा यांची भेट घेऊन मोहोळ पोलीस प्रशासनाच्या खोटे गुन्हे दाखल करण्याच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करण्याची मागणी करणार असल्याची माहिती मोहोळचे माजी सरपंच हाजी बिलाल शेख यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

मोहोळ पोलीस प्रशासनात एजंट मध्यस्थ आणि दलालांचा वावर वाढला आहे. याच व्यक्ती पोलीस स्टेशनचा कारभार आपल्या हातात असल्यागत पोलीस स्टेशन परिसरात चोवीस तास उपलब्ध असतात. एखाद्या घडलेल्या गुन्ह्याची माहिती पोलीस निरीक्षकांना समजण्याच्या अगोदरच यांना समजते आणि ते आरोपींना सावध करून पळवून लावतात. अशाच दलालांचे मोहोळ पोलीस प्रशासनातील काही पोलीस कर्मचारी हस्तक बनले आहेत. मोहोळ सारख्या अत्यंत हेवी बीटला अकार्यक्षम पोलिसांची वर्णी पोलीस प्रशासनाकडून लावण्यात आली आहे. या बीट मधील कर्मचाऱ्यांची अवस्था खायला कार आणि भुईला भार या धोरणाप्रमाणे असून काम कमी आणि वसुलीचा दाम जादा अशी बिकट अवस्था या बीटची झाली आहे. अशा हुकूमशाही स्वभावशैलीच्या कर्मचाऱ्यांमुळे साहजिकच मोहोळ पोलिसांची प्रतिमा मलिम होत आहे याची आम्हाला देखील खंत वाटते असेही यावेळी माजी सरपंच बिलालभाई म्हणाले.

गेल्या पंधरा दिवसांपूर्वी अशीच एक किरकोळ वादाची घटना घडली आणि त्यामध्ये पोलिसांनी अत्यंत चुकीची भूमिका घेत गंभीर स्वरूपाचे गुन्हे काही युवकावर दाखल केले.सदर प्रकाराची देखील चौकशीची मागणीही पोलीस अधीक्षकांना भेटून करणार आहे. याबाबत प्रशासनाकडून ठोस भूमिका घेतली न गेल्यास मुख्यमंत्री तथागृहमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार भाऊ गोरे, ज्येष्ठ नेते राजन पाटील यांना भेटून देखील या गंभीर प्रकाराबाबत माहीती देणार आहे असेही यावेळी माजी सरपंच हाजी बिलाल शेख म्हणाले.

# प्रत्येक गावाला विकास निधीमध्ये समान न्याय मिळालाच पाहिजे - खा. धैर्यशील मोहिते पाटील



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघ, प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रत्येक गावाला विकास निधीमध्ये समान न्याय मिळालाच पाहिजे असे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले.

प्रसिद्धी माध्यमांना माहिती देताना खासदार धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले की, इस्लामपूर ग्रामपंचायतीने सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समिती (DPDC) निधी वाटपाच्या पद्धतीविरोधात उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ कोल्हापूर येथे याचिका दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये मला जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या पत्राचा संदर्भ जोडण्यात आला असून, त्या पत्रामध्ये जिल्हा नियोजन समितीमार्फत विकासकामांच्या वाटपासाठी कोणतेही स्पष्ट, लिखित आणि सार्वजनिक धोरण अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून संपूर्ण जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. विकासकामांचे वाटप कोणत्या निकषांवर होते, कोणत्या गावाला किंवा मतदारसंघाला किती प्राधान्य दिले जाते आणि त्यामागील धोरण काय आहे, याबाबत जनतेला आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना माहिती असणे आवश्यक आहे. सार्वजनिक निधीचा वापर पारदर्शक पद्धतीने होणे ही लोकशाही व्यवस्थेची मूलभूत अपेक्षा आहे.

मी जिल्हा नियोजन समितीचा विशेष निमंत्रित सदस्य म्हणून अनेक ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला आहे. अनेक ठिकाणी विकासकामांसाठी प्रस्ताव दिले गेले, अनेक कामांना शिफारशी मिळाल्या, काही कामे जिल्हा परिषद किंवा इतर अंमलबजावणी यंत्रणांकडे पाठविण्यात आली; मात्र त्या कामांचे पुढे काय झाले याची माहिती संबंधित संस्थांना मिळत नाही. काम कोणत्या टप्प्यावर आहे, प्रशासकीय मान्यता मिळाली आहे का, तांत्रिक मान्यता प्रलंबित आहे का, निविदा प्रक्रिया सुरू आहे का अथवा कार्यादेश देण्यात आला आहे का, याबाबत कोणतीही प्रभावी सार्वजनिक माहिती प्रणाली अस्तित्वात नाही. ही परिस्थिती केवळ प्रशासकीय त्रुटी नसून लोकशाही उत्तरदायित्वाच्या तत्त्वालाच बाधा आणणारी आहे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे जिल्हा नियोजन समितीकडून कामे जिल्हा परिषद किंवा इतर अंमलबजावणी यंत्रणांकडे पाठविल्यानंतर त्यांचा प्रभावी पाठपुरावा होत नसल्याचे दिसून येते. अनेक कामे प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया, कार्यादेश किंवा प्रत्यक्ष अंमलबजावणी या विविध टप्प्यांवर प्रलंबित राहतात. कोणत्या अधिकाऱ्याकडे काम अडकले आहे, विलंबाची कारणे काय आहेत आणि त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे, याची स्पष्ट माहिती उपलब्ध नसते. परिणामी जनतेच्या करातून उभारलेला निधी आणि विकासाच्या संधी दोन्ही वाया जातात. ही स्थिती बदलण्यासाठी वेळबद्ध आणि उत्तरदायी यंत्रणा उभी राहणे आवश्यक आहे.

जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष म्हणून पालकमंत्र्यांची भूमिका केवळ राजकीय कार्यक्रमांना उपस्थित राहणे किंवा निवडणुकांच्या काळात जिल्हाभर दौरे करणे इतपत मर्यादित नसते. जिल्हा नियोजन समितीच्या अध्यक्षपदासोबत विकासकामांच्या नियोजनाचे, अंमलबजावणीचे, देखरेखीचे आणि प्रगतीचा नियमित आढावा घेण्याचे गंभीर दायित्व जोडलेले आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी सुचविलेल्या कामांची स्थिती काय आहे, ती कोणत्या टप्प्यावर प्रलंबित आहेत, कोणत्या अधिकाऱ्यांकडे अडकली आहेत आणि त्यांची अंमलबजावणी का होत नाही याचा नियमित आढावा घेणे ही पालकमंत्र्यांची मूलभूत जबाबदारी आहे. जर निधी वाटपाबाबत स्पष्ट धोरण अस्तित्वात नसेल आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागत असतील, तर त्या परिस्थितीचे गांभीर्याने आत्मपरीक्षण होणे आवश्यक आहे.

आज परिस्थिती अशी आहे की जिल्ह्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांना विकासकामांसाठी न्यायालयाची मदत घ्यावी लागत आहे. ही बाब कोणत्याही लोकशाही व्यवस्थेसाठी समाधानकारक नाही.

नगरसेवक हे आपल्या शहरातील नागरिकांच्या दैनंदिन प्रश्नांशी प्रत्यक्ष जोडलेले असतात आणि रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, स्मशानभूमी, सार्वजनिक आरोग्य आणि नागरी सुविधा यांसारख्या मूलभूत विषयांबाबत त्यांना दररोज जनतेसमोर उत्तर द्यावे लागते. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि जिल्हा परिषद सदस्य यांनाही आपल्या क्षेत्रातील विकासकामांबाबत लोकांना उत्तर द्यावे लागते. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक लोकप्रतिनिधी हा सर्वप्रथम आपल्या मतदारसंघातील जनतेपुढे उत्तरदायी असतो. राजकीय पक्षाला नाही.

ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका या सर्व स्थानिक स्वराज्य संस्था या संस्थांमध्ये कार्यरत असलेले नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि ग्रामपंचायत सदस्य यांच्या साठी हा महत्वाचा प्रश्न आहे.

सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघ, प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था, प्रत्येक ग्रामपंचायत, प्रत्येक नगरपरिषद, प्रत्येक नगरपालिका आणि प्रत्येक गावाला विकास निधीच्या बाबतीत समान संधी मिळाली पाहिजे. कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था किंवा तिचे लोकनियुक्त प्रतिनिधी विकास प्रक्रियेपासून वंचित राहणे ही चिंतेची बाब आहे.

माझी भूमिका अत्यंत स्पष्ट आहे. कोणत्याही एका मतदारसंघाला, गावाला किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेला विशेष वागणूक मिळावी अशी मागणी नाही. मात्र सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक मतदारसंघाला, प्रत्येक ग्रामपंचायतीला, प्रत्येक नगरपंचायतीला, प्रत्येक नगरपरिषदेला, प्रत्येक नगरसेवकाला, प्रत्येक जिल्हा परिषद सदस्याला आणि प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला विकास निधीच्या बाबतीत समान व न्याय्य संधी मिळाली पाहिजे. विकासकामांच्या निवडीसाठी स्पष्ट धोरण असले पाहिजे, मंजूर कामांची माहिती सार्वजनिक केली पाहिजे, अंमलबजावणीसाठी कालमर्यादा निश्चित केली पाहिजे आणि विलंबासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई झाली पाहिजे. विकास निधी हा कोणत्याही पक्षाचा किंवा व्यक्तीचा नसून तो जनतेचा निधी आहे आणि त्याचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचला पाहिजे.

मी राज्य शासन, जिल्हा नियोजन समिती आणि जिल्हा प्रशासनास आवाहन करतो की त्यांनी या जनहित याचिकेकडे विरोधकांच्या टीकेच्या दृष्टीने न पाहता जिल्ह्याच्या विकास व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याची संधी म्हणून पाहावे. केवळ राजकारण न करता; पारदर्शक धोरण आधारित जिल्हा नियोजन व्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे. सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाचा विकास निधीवर समान हक्क आहे. असे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले.

# शासनाचा शब्द, शेतकऱ्यांची अपेक्षा; पंढरपूरातील आंदोलनाला तात्पुरता विराम



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):** राज्य शासनाने जाहीर केलेल्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीतील जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, या प्रमुख मागणीसाठी पंढरपुरात सुरू असलेले आमदार रोहित पवार यांच्यासह २६ जणांचे अन्नत्याग आंदोलन रविवारी मध्यरात्रीपूर्वी स्थगित करण्यात आले. जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीनंतर हा तोडगा निघाला.

पावसाळी अधिवेशनापूर्वी शेतकरी प्रतिनिधी मंडळासह आमदार रोहित पवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीत कर्जमाफीतील अटींबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन शासनाच्या वतीने देण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

शेतकरी शिष्टमंडळामध्ये काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी, किसान सभेचे सचिव अजित नवले, रविकांत तुपकर आदींचा समावेश असणार आहे. या बैठकीत शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा होणार असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले, "गेल्या काही वर्षांतील नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक संकटांमुळे शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे. शासनाने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी त्यामध्ये घालण्यात आलेल्या अनेक अटींमुळे मोठ्या प्रमाणावर शेतकरी लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. या त्रुटींबाबत स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवस संपर्क साधून माहिती घेतली आहे. विठ्ठलाच्या नगरीत शासनाने दिलेला शब्द खोटा ठरणार नाही, अशी आम्हाला अपेक्षा आहे."

आंदोलन स्थगितीच्या कार्यक्रमाला आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार रोहित पाटील, राजेंद्र पवार, प्रणव परिचारक, विकास लवांडे, नागेश फाटे, दीपक वाडदेकर यांच्यासह विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

आभार प्रदर्शन करताना विकास लवांडे यांनी, "हे आंदोलन संपलेले नसून केवळ स्वल्पविराम आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली नाही, तर यापेक्षाही तीव्र आंदोलन उभारले जाईल," असा इशारा दिला.

**जिथून सुरुवात, तिथेच सांगता...**

आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरासमोरील नामदेव पायरी येथे अन्नत्याग आंदोलनास सुरुवात केली होती. रविवारी शिवतीर्थावर आंदोलन स्थगित केल्यानंतर त्यांनी कुटुंबीयांसमवेत पुन्हा नामदेव पायरी येथे जाऊन विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतले, आरती केली आणि प्रसाद स्वीकारून आंदोलनाची सांगता केली.

# पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या उपस्थितीत प्राथमिक शाळेचा प्रवेशोत्सव साजरा



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** शाळेच्या प्रथम दिवशी निमित्त प्रवेशोत्सव कार्यक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंबिका नगर, ता. उत्तर सोलापूर येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वागत सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी केले.

अत्यंत आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी नगरसेविका सौ अलका आनंद भवर, चावडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महादेव राऊत, पोलीस उपनिरीक्षक आनंद भवर, पोलीस उपनिरीक्षक सतीश बावणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सौ लक्ष्मी कनकधर, उपाध्यक्ष प्रज्ञा राऊत, मान्यवर उपस्थित होते.

पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी बोलताना विद्यार्थ्यांना जीवनात मोठे होण्यासाठी भरपूर अभ्यास करण्याची गरज असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी पुस्तकांना मित्र बनवले पाहिजे. सरकारी शाळेत शिकून अनेकजण मोठ्या हुद्यावर काम करत आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमधील उत्साह आणि शाळेचा हिरवागार परिसर येथे आनंदी वातावरणात शिक्षणाची उत्तम संधी निर्माण होत असल्याचेही त्यांनी सांगितले. आजच्या दिवसाचे महत्त्व वयाने मोठे झाल्यावर विद्यार्थ्यांना नक्की कळेल, असे त्यांनी पुढे म्हटले.

कार्यक्रमात पहिलीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, स्कुल बॅग, गणवेश, शूज आणि पाठ्य पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाआधी सजविलेल्या जीपमधून विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी व औक्षण करण्यात आले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. तसेच आनंद भंवर यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. या कार्यक्रमात आनंद भंवर आणि इतर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात जिल्हा परिषद सोलापूरचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख आणि शिक्षण विस्तार अधिकारी बापूराव जमादार यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांना साहित्य वाटप केले आणि नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिद्धाराम माशाळे यांनी केले. सूत्रसंचालन शिवशंकर राठोड यांनी केले. आभार प्रदर्शन श्रीमती रसिका बंदिछोडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक दीपक काळे, श्रीमती वैशाली गोंदकर, श्रीमती विद्या वरडुळे, शिवाजी वडते यांनी परिश्रम घेतले.

# बुलेट ट्रेन, शक्तीपीठ महामार्ग रद्द करा; शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या : राजू शेट्टी



**आंदोलनस्थळी शेतकऱ्यांची मोठी गर्दी**

अन्नत्याग आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी आंदोलनाची तीव्रता अधिक वाढल्याचे दिसून आले. राज्यातील विविध भागांतून शेतकरी पंढरपुरात दाखल झाले असून छत्रपती शिवाजी चौक परिसरात दिवसभर मोठी गर्दी होती. मागण्यांचे फलक हातात घेऊन शेतकऱ्यांनी घोषणाबाजी केली. आंदोलनाची वाढती तीव्रता लक्षात घेता प्रशासनाने परिसरातील पोलीस बंदोबस्त वाढविला असून वाहतुकीच्या मार्गातही बदल करण्यात आला आहे.

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त) :** उद्योजकांची कर्जे माफ करताना सरकारने जो न्याय लावला, तोच न्याय शेतकऱ्यांनाही देत विनाअट सरसकट कर्जमाफी जाहीर करावी. महाराष्ट्राच्या कोणत्याही फायद्याचे नसलेले बुलेट ट्रेन आणि शक्तीपीठ महामार्गासारखे प्रकल्प रद्द करून सरकारने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली.

आमदार रोहित पवार यांनी कर्जमाफीतील जाचक अटी रद्द करण्याच्या मागणीसाठी पंढरपुरात सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या शेट्टी यांनी सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांवर जोरदार टीका केली. अन्नत्याग आंदोलनाच्या तिसऱ्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, खासदार बजरंग सोनवणे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील केदार, सलील देशमुख, आमदार राजू खरे, आमदार अभिजित पाटील, शेकापचे नेते जयंत पाटील, माजी मंत्री तथा रासपचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर, रविराज साबळे-पाटील यांच्यासह विविध पक्ष व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देत पाठिंबा दर्शविला.

यावेळी बोलताना राजू शेट्टी यांनी राज्यातील मोठे प्रकल्प हे जनहितासाठी नव्हे तर आर्थिक स्वार्थासाठी राबविले जात असल्याचा आरोप केला. "सत्ताधाऱ्यांना निवडणुकांसाठी पैसा गोळा करायचा आहे. राज्याची लूट करणाऱ्यांना जनता योग्य वेळी धडा शिकवेल," असे ते म्हणाले.

सरकारने पुढील एक-दोन दिवसांत कर्जमाफीवरील अटी रद्द केल्या नाहीत तर राज्यभर आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा उपस्थित नेत्यांनी दिला. तसेच सरसकट कर्जमाफीचा निर्णय न झाल्यास मुख्यमंत्र्यांना राज्यात फिरणे कठीण होईल, असा इशाराही शेट्टी यांनी दिला.

# ज्ञान, संस्कार आणि आरोग्यदायी शिक्षणातून घडवूया उज्ज्वल भविष्य! - चेतनसिंह केदार-सावंत



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** राजुरी येथील जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेला शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी शाळेत प्रथमच दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, शाळेचा गणवेश व पाठ्यपुस्तके देऊन स्वागत करण्यात आले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी परिसरात सणासारखे वातावरण निर्माण झाले होते. रंगीबेरंगी सजावट, शिक्षकांचे आपुलकीने भरलेले स्वागत आणि पालकांच्या चेहऱ्यावरील आनंद यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना नियमित अभ्यास, पुस्तकांशी मैत्री आणि शिक्षणाच्या माध्यमातून जीवनात यश संपादन करण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षकांनी अधिक प्रयत्नशील राहावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष लागवड व संवर्धन ही काळाची गरज असून भावी पिढ्यांसाठी पर्यावरणाचे रक्षण करणे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. यावेळी शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत म्हणाले, ह्शाळा प्रवेशोत्सव हा केवळ एक कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांच्या सुंदर प्रवासाची सुरुवात आहे. आज शाळेत प्रवेश घेणारे हे चिमुकले विद्यार्थीच उद्याचा देश घडविणार आहेत.

या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य सदाशिव दबडे, केंद्रप्रमुख दिनकर गाडे, शाखा विस्तार अधिकारी भंडारी सर, सूर्यकांत खुळे, सरपंच प्रतिभाताई व्हळगळ, उपसरपंच मोहिनीताई काटे, महेश काटे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक बडंगर, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, पत्रकार, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोहोळ तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा सज्ज




**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रदीर्घ विश्रांतीनंतर मोहोळ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांची सोमवार ता 15 रोजी घंटा वाजली असून, यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व अध्यक्षांनी शाळा खोल्या धुवून स्वच्छ केल्या आहेत.यात विद्यार्थीही सहभागी झाले होते.

जुन्या व नवोदित विद्यार्थ्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केली आहे. दरम्यान विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी जिल्ह्यातील विविध विभागाचे अ वर्ग दर्जाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तारीख 2 मे रोजी बहुतांश शाळांना सुट्टी लागली होती.1 मे रोजी विद्यार्थ्यांचा रिझल्ट देण्यात आला होता. शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर बाजार पेठेत दप्तर, वह्या व इतर शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांसह चिमुकल्यानी गर्दी केली आहे. अनेक शाळात विद्यार्थ्यांच्या स्वागता साठी व मिरवणुकी साठी घोडे, ट्रॅक्टर, बैलगाडी, जेसीबी आदींची तयारी करण्यात आली आहे. शिक्षणाधिकारी कादर शेख, गटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक हे गावोगावच्या जिल्हा परिषद शाळांना भेटी देऊन तयारीचा आढावा घेत आहेत.

मोहोळ तालुक्यात एकूण 338 शाळा आहेत. त्यात जिल्हा परिषदेच्या- 244, खाजगी अनुदानित- 71 व स्वयं अर्थ साहाय्यांच्या- 23 अशी वर्गवारी आहे. विद्यार्थ्यांच्या स्वागता साठी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस उपायुक्त वृष्टी जैन आधीसह अन्य अधिकारी शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. अनेक शाळांनी विद्यार्थ्यांसाठी मिष्टांन्न भोजनाची ही व्यवस्था केली आहे.

विद्यार्थ्यांच्या सूरक्षेसाठी पापरी शाळेने 30 वर्ग खोल्या साठी गेल्या दोन दिवसापासून 44 सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने सीसीटीव्ही बसविणारी पापरीची शाळा जिल्ह्यात एकमेव आहे.